# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

पत्र क्र.नाविमं / मागो–प्रात्य / 210
नागपूर, दिनांक: 19 / 01 / 23

<u>महत्त्वाचे / परीक्षा प्राधान्य</u>

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग.

**विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च 2023 च्या तोंडी व श्रेणी परीक्षा तसेच प्रात्यक्षिक परीक्षेबाबत.**

**संदर्भ. :– रा मं. पत्र क. परीक्षा 6 / 6973 दिनांक 30 / 12 / 2022**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च –2023 च्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा / अंतर्गत मूल्यमापन परीक्षा आयोजनाच्या तारखांबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे .

1) विज्ञान व तंत्रज्ञान विषयाची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा तसेच शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व पूर्व व्यावसायिक व NSQF अंतर्गत व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा **शुक्रवार दि. 10 / 02 / 2023 ते बुधवार दि. 01 / 03 / 2023** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

**२) दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**

| अ. क. | विषय सांकेतांक | विषयाचे नांव | वार | दिनांक | सत्र |
|---|---|---|---|---|---|
| 1. | जे–1 | घरगुती विद्युत उपकरणे Electrical Domestic Appliances | सोमवार | 27 / 03 / 2023 | दुपार |
| 2. | जे–5 | दूध व दुधाचे पदार्थ Milk And Milk Products | मंगळवार | 28 / 03 / 2023 | दुपार |
| 3. | जे–9 | हस्तभरतकाम Hand Embroidery | बुधवार | 29 / 03 / 2023 | दुपार |
| 4. | के–1 | शिवणयंत्राद्वारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरूस्ती.<br>Stitching with Sewing Machine and its Repairing and Maintenance | शुक्रवार | 31 / 03 / 2023 | दुपार |
| 5. | के–5 | टाकाऊ वस्तुपासून सौंदर्याकृती.<br>Preparation of Decorative pieces by utilization of waste material | शनिवार | 01 / 04 / 2023 | दुपार |
| 6. | एल–7 | पाककला Cookery | सोमवार | 03 / 04 / 2023 | दुपार |
| 7. | एम–3 | भारतीय संगीत (गायन–वादन) Indian Music ( Vocal & Instrumental) | बुधवार | 05 / 04 / 2023 | दुपार |
| 8. | एम–6 | चित्रकला व रंगकाम Drawing and Painting | गुरुवार | 06 / 04 / 2023 | दुपार |
| 9. | एम–7 | कागदकाम पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी.<br>Paperwork,Cardboard work and Bookbinding | शनिवार | 08 / 04 / 2023 | दुपार |

विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बहि:स्थ परीक्षक (External Examiner) म्हणून जवळच्या शाळेतील विज्ञान शिक्षकांची नियुक्ती मंडळाकडून करण्यात येणार आहे. अंतर्गत परीक्षकांच्या आदेशपत्रानुसार त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा बहि:स्थ परीक्षकांच्या मदतीने घ्यावयाची आहे. परंतु अंतर्गत परीक्षकांचे आदेश मुख्याध्यापकांच्या नावाने असल्यास आपल्या शाळेतील इयत्ता 10 वी ला विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांचे अध्यापन करणाऱ्या ज्येष्ठ शिक्षकांची अंतर्गत परीक्षक म्हणून सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती करण्याचे अधिकार मुख्याध्यापकास देण्यात आले आहेत. नियुक्त केलेल्या शिक्षकांना लेखी आदेश निर्गमित करावेत.

मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकास ज्या शाळेवर बहि:स्थ परीक्षक म्हणून नेमणूक दर्शविण्यात आलेली आहे त्या शाळेवर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याकरीता लेखी आदेश निर्गमित करून प्रात्यक्षिक परीक्षेकरीता कार्यमुक्त करावे.

**महत्वाच्या सूचना -**

1)प्रात्यक्षिक परीक्षेच्या साहित्यासाठी दोन पाकीटे पुरविण्यात आली असून अ) सर्व भाषा विषयाच्या तोंडी (प्रथम / द्वितीय व तृतीय भाषा) व सामाजिक शास्त्र, गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाचे